**मंत्रीमंडळ बैठकीचे निर्णय :** दिनांक १२ जानेवारी २०१०

मुंबई, दि. १२: आज झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले.

**टॅक्सी, ऑटोरिक्षा परवाना हस्तांतरण करण्यास मान्यता**

टॅक्सी, ऑटोरिक्षा परवाना हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात आली.

या निर्णयामुळे मुंबई प्राधिकरण क्षेत्रात हस्तांतर शुल्कापोटी शासनास अंदाजे १०० कोटी इतका महसूल मिळू शकेल. त्याचप्रमाणे राज्याच्या अन्य शहरात देखील टॅक्सी / ऑटोरिक्षा परवाना हस्तांतरण होईल व त्यातुनही शासनास मोठ्या प्रमाणावर महसूल मिळेल. मुंबईमध्ये ५० हजार टॅक्सी व १ लाख ऑटोरिक्षा आहेत व राज्यात १.३३ लाख टॅक्सी व ७ लाख रिक्षा आहेत. वरील निर्णयामुळे कमीत कमी १० टक्के टॅक्सी ऑटोरिक्षा परवान्यांचे हस्तांतर होईल.

नोव्हेंबर १९९७ पासून मुंबईत टॅक्सी / ऑटोरिक्षा नवीन परवान्यावर बंदी घालण्यात आलेली आहे. राज्यातील महानगरपालिका व अ वर्ग नगरपरिषदा क्षेत्रात १९९७-९८ पासून नवीन ऑटोरिक्षा परवान्यावर बंदी घालण्यात आली आहे. ही बंदी अद्याप कायम आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ९१ (६) अन्वये टॅक्सी / ऑटोरिक्षा परवाना एका व्यक्तीच्या नावावरून दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर हस्तांतर करण्यास बंदी आहे. नवीन परवाने मिळत नसल्यामुळे तसेच एका व्यक्तीच्या नावावरील परवाना दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर हस्तांतर करण्यास (कायदेशीर वारस वगळून) कायदेशीर अडचणी असल्यामुळे टॅक्सी / ऑटोरिक्षा परवानाधारक बेकायदेशीर दुसऱ्या व्यक्तीबरोबर परस्पर करार करून परवाना वापरावयास देतात. या व्यवहारामुळे शासनास कोणताही महसूल मिळत नव्हता. त्यामुळे महाराष्ट्र मोटार वाहन नियमात सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता होती.

वरील सर्व बाबींमुळे टॅक्सी / ऑटोरिक्षा परवाना हस्तांतरणासंदर्भातील कायदेशीर अडचण दूर करण्याकरिता शासनाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ९१ (६) मध्ये एका व्यक्तीच्या नावावरील परवाना दुसऱ्या व्यक्तिच्या नावावर हस्तांतर करण्यासंबंधीचा निर्णय घेऊन त्यासंदर्भातील प्रारूप अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द केली आहे. अंतिम अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

परवान्यांचे हस्तांतरण व्यक्तीच्या नावावर करण्यामध्ये वैयक्तिक व्यक्ती तसेच एखाद्या टॅक्सीचा व्यवसाय करणारी कंपनी अंतर्भूत आहे. अशा परिस्थितीत वैयक्ति टॅक्सीचा व्यवसाय करणाऱ्या कंपनीसाठी परवाना हस्तांतराचे शुल्क वेगळे राहतील. टॅक्सी व ऑटोरिक्षा परवाना हस्तांतरणाकरिता मुंबई, ठाणे व पुणेसाठी रुपये २५ हजार व राज्यातील अन्य शहरासाठी रुपये ५ हजार वैयक्तिक व्यक्तीसाठी परवाना हस्तांतरणाचे शुल्क आकारले जाईल.

-----------

**स्लीपर कोच शयनिकांच्या संख्येत वाढ**
**२५ कोटीचा अतिरिक्त महसूल मिळणार**

स्लीपर कोच शयनिकांच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

स्लीपर कोच संबंधी महाराष्ट्र मोटार वाहन या नियमात विहीत केलेल्या लांबी, रुंदी आकारमानानुसार वाहनांतील शयनिकांची रचना १ X १ अशा पध्दतीने करता येते. अशा पध्दतीने शयनिकांची रचना केल्यास शयनिकांची एकूण संख्या २० पर्यंत होऊ शकते. मात्र इतर राज्यात २ X १ शयनिकांची रचना मंजूर असल्यामुळे त्या वाहनांतील शयनिकांची संख्या ३० इतकी आहे. अधिक शयनिकांमुळे प्रवाशांवरील तिकिटांचा भार विभागून तो दरडोई कमी होतो. जास्त शयनिकांमुळे शासना वाढीव महसूल कर रुपाने मिळू शकतो. वाहनांतील शयनिकांची रचना २ X १ प्रमाणे

. . . २/

केल्यास राज्यातील बस चालक इतर राज्यातील बस चालक / मालकाशी स्पर्धा करू शकतील. त्याकरिता महाराष्ट्र मोटार वाहन नियमात सुधारणा करण्याची मागणी वाहतूक संघटनेकडून करण्यात आली होती.

या बाबींचा विचार करून शासनाने राज्यातील स्लिपर कोच बसेस मधील शयनिकांची रचना १ X १ ऐवजी २ X १ करण्याकरिता महाराष्ट्र मोटार वाहन नियमामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबाबतची प्रारूप अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यासाठी कार्यवाही सुरू आहे.

स्लीपर कोच बसमधील शयनिकांची रचना बदलल्याने वाहनातील शयनिकांची रचना २० वरुन ३० होईल. सध्या साध्या व वातानुकुलीत स्लीपर कोच बसेसच्या प्रत्येक शयनिकेकरिता दरवर्षी अनुक्रमे रु.५ हजार व रु.७ हजार असा प्रवासी कर आकारला जातो. वाहनातील शयनिकांची संख्या १० ने वाढल्यास शासनास प्रती वाहन प्रती वर्ष रु.५० हजार व रु.७० हजार इतका जादा प्रवासी कर मिळेल. राज्यातील स्लीपर कोच बसेसची ४१९ संख्या विकचारात घेता दरवर्षी शासनास रुपये २५ कोटी जादा महसूल कर रुपाने प्राप्त होईल.

----------

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक**
**विहित मुदतीत खर्चाचा हिशेब सादर न केल्यास**
**उमेदवार अपात्र ठरणार**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनिययम १९६१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने विहित मर्यादेत खर्च करून राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या मुदतीत निवडणूक खर्चाचा हिशेब न दिल्यास त्याला अपात्र ठरविण्यात येईल.

राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीच्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराकरिता सुधारित खर्चाची मर्यादा विहित केली आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास रुपये ६० हजार, पंचायत समितीची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास रुपये ४० हजार आणि ग्रामपंचायती निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास ७ हजार ५०० अशी खर्चाची मर्यादा आहे.

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायतीची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने विहित मर्यादेत खर्च करून राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या मुदतीत निवडणूक खर्चाचा हिशेब न दिल्यास हे उमेदवार ५ वर्षांच्या कालावधीकरिता सदस्य म्हणून रहाण्यास किंवा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अपात्र असतील अशी सुधारणा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मध्ये अंतर्भूत करण्यात येईल.

राज्य निवडणूक आयोग, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती व्यक्ती अपात्र असल्याचे घोषित करील. अशी व्यक्ती, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीकरिता, ग्रामपंचायत सदस्य म्हणून राहण्यास किंवा ग्रामपंचायत सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अपात्र राहील.

राज्य निवडणूक आयोगास, कारणे लेखी नोंदवून, पोटकलम (१ ठ)(१) खालील कोणतीही अपात्रता दूर करता येईल किंवा अशा कोणत्याही अपात्रतेचा कालावधी कमी करता येईल.

------------

. . .३/

## ऊर्जा विभागाचे वित्तीय स्त्रोत वाढविण्याचा निर्णय

ऊर्जा विभागाचे वित्तीय स्त्रोत वाढविण्यासंदर्भात पुढील निर्णय घेण्यात आला.

या निर्णयानुसार - औद्योगिक ग्राहकांना सध्या आकारण्यात येणारे विद्युत शुल्क ६ टक्के ऐवजी ९ टक्के दराने आकारण्यात येईल. सिनेमा ग्राहकांना सध्या आकारण्यात येणारे विद्युत शुल्क ८ टक्के ऐवजी १० टक्के दराने आकारण्यात येईल. निवासी ग्राहकांना सध्या आकारण्यात येणार विद्युत शुल्क १२ ऐवजी १५ टक्के दराने आकारण्यात येईल. व्यापारी ग्राहकांना सध्या आकारण्यात येणार विद्युत शुल्क १३ ऐवजी १७ टक्के दराने आकारण्यात येईल. अनुज्ञापक मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठी आकारावयाचे शुल्क, विद्युत संच निरीक्षण शुल्क व उदवाहन निरीक्षण शुल्कात वाढ केल्यामुळे रु.५२.०३ कोटी इतकी महसूलात वाढ होईल.

राज्यात सध्या लागू असलेले विद्युत शुल्काचे दर व हे दर दिनांक १ एप्रिल २००३ पासून लागू आहेत. औद्योगिक वापरासाठी आकारण्यात येणाऱ्या ६ टक्के विद्युत शुल्काची रक्कम वाढवून ती ९ टक्के केल्यास सध्या मिळणाऱ्या महसूलात एकूण रु.३१५२८.८० लक्ष एवढी वाढ होईल. सिनेमाच्या शुल्कात ८ टक्के वरुन १० टक्के पर्यंत वाढ केल्यास रु.१७१.८२ लक्ष एवढी महसूलात वाढ होईल. सिनेमा व औद्योगिक ग्राहकांना सुधारित दराने शुल्क आकारणी केल्यास एकूण रु.३१७००.८२ लाख वार्षिक महसूल वाढ अपेक्षित आहे.

निवासी वापरासाठी आकारण्यात येणाऱ्या १२ टक्के विद्युत शुल्काची रक्कम वाढवून ती १५ टक्के केल्यास सध्या मिळणाऱ्या महसूलात एकूण रु.१९९२३.३६ लक्ष एवढी वाढ होईल. व्यापारी वापरासाठीच्या शुल्कात १३ टक्के वरुन १७ टक्के पर्यंत वाढ केल्यास रु.२०७२०.५० लक्ष एवढी महसुलात वाढ होईल. निवासी व व्यापारी ग्राहकांना सुधारित दराने शुल्क आकारणी केल्यास एकूण रु.४०६४३.८६ लाख इतकी वार्षिक महसूल वाढ अपेक्षित आहे.

अशा रितीने वीज शुल्कामध्ये वाढ केल्यामुळे रु. ७२३४४.४८ लक्ष इतकी वार्षिक महसूली वाढ होईल. (सध्या हा महसूल २१२३११.५८ लाख रुपये आहे).

ऊर्जा विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कार्यक्रमांतर्गत वसूल करण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये पुढील प्रमाणे वाढ करण्यात येईल.

अनुज्ञापक मंडळाकडून घेतल्या जाणाऱ्या परिक्षांसाठी उमेदवारांना तसेच ठेकेदारांच्या आकारावयाच्या शुल्कात वाढ करण्याबाबत.

अनुज्ञापन मंडळाकडून भारतीय विद्युत अधिनियम १९५६ मधील नियम ४५ अन्वये विद्युत पर्यवेक्षक, तारतंत्री यांच्या परीक्षा घेण्यात येऊन उत्तीर्ण उमेदवारांना प्रमाणपत्र देण्यात येते. तसेच ठेकेदारांना अनुज्ञप्ती प्रमाणपत्र देण्यात येते. त्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सन १९९७ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे या परीक्षांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कात तसेच द्यावयाच्या प्रमाणपत्राच्या शुल्कामध्ये वाढ करण्यात येईल.

याशिवाय इतर किरकोळ आनुषंगिक शुल्कात सुधारणा केल्यामुळे सध्या मिळणाऱ्या एकूण रु.४६.६९ लाख इतक्या महसुलात वाढ होऊन ही महसुलाची रक्कम रु.१८६.७६ लाख इतकी होईल. ही वाढ प्रस्तावित करण्याची प्रमुख कारण पुढीलप्रमाणे आहेत-

गेल्या १२ वर्षामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. परीक्षा घेण्यासाठी येणारा सध्याचा खर्च ७०-७५ टक्क्यापर्यंत वाढलेला आहे. संगणकीकरणासाठी येणारा खर्च, शुल्कवाढ करताना विचारात घेतलेला आहे.

**विद्युत संच निरीक्षण शुल्क दरवाढ**

सर्व ग्राहकांकडून विद्युतसंचाच्या मांडणीच्या क्षमतेच्या दृष्टीने निरीक्षण करणे हे विद्युत अधिनियम, २००३ च्या तरतुदीनुसार अत्यावश्यक आहे. सर्वसाधारणपणे उच्चदाब (औद्योगिक, कृषी आणि व्यापारी), व करमणूक संच इ.

संचाच्या मांडणीचे निरीक्षण करणे अत्यावश्यक असून त्यासाठी निरीक्षण फी आकारण्यात येते. निरीखण फी चे दर यापूर्वी सन १९९६ मध्ये निश्चित करण्यात आलीले असून या निरीक्षक शुल्कामध्ये वाढ करण्यात येईल.

विविध प्रकारच्या निरीक्षणासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काचे दरात सुधारणा केल्यामुळे सध्या मिळणाऱ्या रु.४७७१.७० लाख महसूलात वाढ होऊन तो रु.९४८३.४० इतका होईल.

**उदवाहन निरीक्षण शुल्क**

मुंबई उदवाहन नियम, १९३९ च्या तरतुदीनुसार उदवाहन निरीक्षण आकारण्यात यावयाच्या शुल्काची रक्कम १९९७ साली निश्चित करण्यात आली होती. गेल्या १२ वर्षात या उदवाहन निरीक्षण दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. राज्यात सध्या उदवाहनांच्या संख्येत होणारी वाढ विचारात घेता उदवाहन निरीक्षण शुल्कात सुधारणा करण्यात येणार आहे. उदवाहन निरीक्षण शुल्कात सुधारणा केल्यास सध्या मिळणाऱ्या रु.२८९.१० लाख इतक्या महसुलात वाढ होऊन तो रु.६४१ लाख इतका होईल.

सुधारित दर प्रस्तावित करताना पुढील बाबी विचारात घेण्यात आल्या आहेत.

१) मागील १२ वर्षात उदवाहन निरीक्षण दरामध्ये वाढ केलेली नाही. २) १२ वर्षात भाव निर्देशांकात ७० टक्के वाढ झालेली आहे. ३) संबंधित खर्चात झालेली वाढ सुमारे ५० टक्क्यांपर्यंत आहे.

उपरोक्त ३ बाबींमुळे राज्याचे सध्या मिळणारा वार्षिक महसूल रु.४१०७.४९ लाख वरुन रु.१०३११ लाख इतका वाढेल. अशाप्रकारे वार्षिक महसूलात रु.५२०३.६७ लाख इतकी वाढ होईल.

----------

**मुंबई न्यायालय शुल्क (सुधारणा) अध्यादेश २००९**
**पुर्नप्रख्यापित करण्यास मान्यता**

मुंबई न्यायालय शुल्क (सुधारणा) अध्यादेश २००९ पुर्नप्रख्यापित करण्यास आज मान्यता देण्यात आली.

या निर्णयानुसार राज्यपालांना हा अध्यादेश पुर्नप्रख्यापित करण्याबाबत विनंती करण्यात येईल. लवाद व समेट अधिनियम १९६६ अन्वये याचिका व अपिले यातील प्रस्तावित शुल्क वाढीनुसार फी भरण्याच्या तरतुदीतून शासनास वगळण्यात आले आहे.

अर्ज व अपिल यांच्या संख्येत प्रचंड वाढ होत असून अशा अर्जांवर न्यायालय फी बसविण्यासाठी कोणतीही तरतूद नसल्यामुळे अर्जदारास जो निवाडा रद्द करण्यासाठी किंवा सुधारणा करण्यासाठी त्याने अर्ज दिला असेल त्यातील रकमेवर फीच्या १/२ इतकी रक्कम न्यायालय फी लागू करण्यात येईल. या वाढीबाबत अध्यादेश जारी करण्यात आला असून या फी वाढीबाबतची अंमलबजावणी १ सप्टेंबरपासून सुरु झाली. या अध्यादेशामुळे ५ प्रमुख जिल्ह्यांमधून ६ लाख ५२ हजार ५९९ इतकी न्यायालयीन फी जमा झाली आहे. या अध्यादेशासंबंधिचे विधानसभा विधेयक ८ डिसेंबर २००९ रोजी मांडण्यात आले होते. तथापि, २३ डिसेंबर रोजी विधीमंडळाची सत्र समाप्ती झाल्यामुळे विधेयकावर चर्चा होऊन ते संमत होऊ शकले नाही. त्यामुळे हा अध्यादेश पूर्वलक्षी प्रभावाने पुर्नप्रख्यापित करण्यास मान्यता देण्यात आली.

-------------

**आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांची आर्थिक**
**मर्यादा वाढविण्यास मान्यता**

शासकीय तसेच अनुदानित महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील विद्यार्थ्यांची आर्थिक मर्यादा वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला.

अभियांत्रिकी, औषधीनिर्माण शास्त्र, हॉटेल मॅनेंजमेंट यासारख्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांमधील पदविका, पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा १५ हजारावरून १ लाख एवढी वाढविण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे ३८१४ विद्यार्थ्यांना लाभ मिळेल.

---------------

**...५/**

**आंतरजातीय विवाह योजनेच्या अर्थसहाय्यात**
**रु.१५ हजार वरुन रु.५० हजार वाढ करण्याचा निर्णय**

आंतरजातीय विवाह करणाऱ्या सवर्ण व मागासवर्ग व आंतर मागासवर्गीय प्रवर्गातील जोडप्यांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यामध्ये रुपये १५ हजारवरुन रुपये ५० हजार पर्यंत वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी सन २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये आवश्यक तरतूद अर्थसंकल्पात करण्यात येईल.

समाजातील जातीभेद निर्मूलन होण्यासाठी आंतरजातीय विवाह करणाऱ्या सवर्ण (हिंदू, लिंगायत, जैन, शिख) व मागास प्रवर्गातील (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती) तसेच आंतर मागास प्रवर्गातील जोडप्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्याची योजना सन १९५८ पासून शासनामार्फत राबविण्यात येत आहे. योजनेअंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या उपरोक्त प्रवर्गातील जोडप्यांना रुपये १५ हजार एवढे अर्थसहाय्य अपुरे असल्यामुळे ही योजना प्रभावीपणे राबविता येत नाही. त्यामुळे अर्थसहाय्यामध्ये वाढ करण्यात येत आहे.

आंतरजातीय विवाहितांना प्रोत्साहन देण्याची सुधारित अर्थसहाय्याचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.

(१) रुपये २५ हजार पती-पत्नीच्या संयुक्त नावाने पोस्टाच्या इंदिरा विकास पत्रात, (२) रुपये २० हजार धनादेशाद्वारे, (३) रुपये ५ हजार इतर अनुषंगिक खर्च (भांडी, स्वागत समारंभ इ.),

ही योजना समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत राबविण्यात येईल. आंतरजातीय विवाहाचे वाढीव अनुदान शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून देय राहील. या योजनेचा लाभ विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना लागू राहील.

ही योजना केंद्र व राज्य सरकार यांच्या संयुक्त अर्थसहाय्याने राबविण्यात येते. यामध्ये केंद्राचा हिस्सा ५० टक्के व राज्याचा हिस्सा ५० टक्के असा आहे. योजनेच्या अर्थसहाय्यामध्ये रुपये १५ हजार वरुन ५० हजार पर्यंत वाढ केल्यास एकूण १००० जोडप्यांसाठी रु. ५०० लाख एवढा वार्षिक वित्तीय भार पडेल. त्यापैकी ५० टक्के (रु.२५० लाख) केंद्र शासनाकडून उपलब्ध होईल व राज्य शासनावर रु.२५० लाख इतका वार्षिक वित्तीय भार पडेल.

-----------

**महाराष्ट्र पशु व मत्स्य व्यवसाय विज्ञान विद्यापीठाच्या**
**कुलगुरूपदाच्या निवडीसाठी अधिनियमात सुधारणा**

महाराष्ट्र पशु व मत्स्य व्यवसाय विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदावर उच्च शिक्षित तसेच उत्कृष्ट अशी योग्य व्यक्ती असवी यासाठी महाराष्ट्र पशु व मत्स्य व्यवसाय पिज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र पशु व मत्स्य व्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ मधील अधिनियम १६(१) अन्वये कुलगुरूंच्या निवडीसंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे. कुलगुरू हे विद्यापीठाचे शैक्षणिक व कार्यकारी प्रमुख असून विद्यापीठाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि विद्यापीठाच्या व्यवस्थापनासाठी विद्यापीठाचे शैक्षणिक कार्यक्रम आणि सर्वसाधारण प्रशासनाच्या विकासासाठी ते जबाबदार आहेत. त्यामुळे महाराष्ट्र पशु व मत्स्य व्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ मधील अधिनियम १६(१) मध्ये तसेच त्याअनुषंगाने १६(२) सुधारणा करण्यात येईल.

**कुलगुरूची पुढील पद्धतीने नियुक्ती केली जाईल :-**

**(अ)** कुलगुरुच्या नियुक्तीसाठी योग्य नावांची शिफारस करण्याकरिता पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक समिती असेल :-

(एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेले सदस्य (सर्वोच्च न्यायालयाचा निवृत्त न्यायाधीश असेल किंवा उच्च न्यायालयाचा निवृत्त मुख्य),

(दोन) कृषी व पदुम विभागाचा सचिव/प्रधान सचिव किंवा राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला शासनाच्या सचिव/प्रधान सचिवांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी;

(तीन) महासंचालक भारतीय कृषी संशोधन परिषद, नवी दिल्ली;

. . .६/

(चार) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य हा समितीचा अध्यक्ष असेल;

(पाच) नामनिर्देशित केलेले सदस्य हे विद्यापीठाशी किंवा कोणत्याही महाविद्यालयाशी अथवा विद्यापीठाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेशी संबंधित नसलेल्या व्यक्ती असतील;

(सहा) समितीचे सर्व तीन सदस्य उपस्थित असल्याखेरीज समितीची कोणतीही बैठक घेतली जाणार नाही;

**(ब)** कमीत कमी पाच योग्य व्यक्तींच्या नामिकेची कुलगुरू म्हणून नियुक्ती केली जाण्यासाठी शिफारस ही समिति, कुलपतीच्या विचारार्थ, करील.

**(क)** अशा नामिकेतील व्यक्तिंमधून एकाची कुलगुरूच्या पदासाठी कुलपतींना नेमणूक करता येईल.

**कलम १६(२) मध्ये करावयाची सुधारणा** - कलम १६(२) ``नामिका तयार करण्याची प्रक्रिया ही, कुलगुरूची जागा रिक्त होणाऱ्या संभाव्य दिनांकापूर्वी कमीत कमी तीन महिने अगोदर सुरू होईल. ती कुलपतीने ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल. तथापि, कुलपतीला, परिस्थितीच्या निकडीनुसार, कालावधी वाढविणे आवश्यक असल्यास तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधी वाढवला जाणार नाही.

---oo---

## खरीप २०१० साठी स्फुरदयुक्त/पालाशयुक्त व संयुक्त खताचा संरक्षित साठी (बफर्स स्टॉक) करण्यास मान्यता

खरीप हंगाम २०१०-११ करिता राज्यामध्ये ५ लाख मे. टन. डिएपी, एमओपी व संयुक्त खते तर १ लाख मे. टन. पोटॅश खताची आयात करून संरक्षित साठा करण्यास मान्यता देण्यात आली.

यासाठी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ व महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन या दोन्ही संस्थांची शासनातर्फे नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात येईल. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ ३.५० लाख मे. टन स्फुरदयुक्त/पालाशयुक्त व संयुक्त खते उदा. डिएपी, एमओपी, संयुक्त खते आणि महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशनने २.५० लाख मे. टन स्फुरदयुक्त/पालाशयुक्त व संयुक्त खते आयात करून खताचा संरक्षित साठा करेल. यासाठी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाला रु. ३२५ कोटी आणि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशनला रु. २२५ कोटी इतके कर्ज घेण्यास शासन हमी देण्यात येईल.

महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ आणि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन या दोन्ही संस्थांना खत साठवणूक करण्यासाठी येणाऱ्या रु. ७६ कोटी इतक्या खर्चाची प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येईल.

खरीप २०१० साठी खताची आयात केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या कंपनीमार्फत करण्यात येईल.

राज्यातील मागील दोन-तीन खरीप हंगाम विचारात घेता सुमारे ३० ते ३५ लाख मे. टन खताचा वापर होतो. खरीप हंगामामध्ये मे, जून व जुलै या कालावधीत खताची खरेदी व प्रत्यक्ष वापर मोठ्या प्रमाणावर होतो. या कालावधीमध्ये (निरनिराळ्या कारणामुळे उदा. आवंटन कमी असणे, पाऊस किंवा अतिवृष्टीमुळे रेल्वे वाहतुकीमध्ये अडथळा येणे, रेल्वे रेक वेळेवर उपलब्ध न होणे, सामाजिक आंदोलन इत्यादीमुळे) खताचा वाहतुकीवर विपरित परिणाम होतो. प्रामुख्याने डीएपी व संयुक्त खताचा पूर्ण हंगामात मागणीप्रमाणे पुरवठा होण्यास अडचणी उद्‌भवतात. राज्यात जवळजवळ ८० टक्के क्षेत्र हे कोरडवाहू असून यातील जास्तीत जास्त क्षेत्र हे मराठवाडा व विदर्भातील आहे. या

भागात प्रामुख्याने कापूस व सोयाबीन यासारखी नगदी पिके घेतली जातात व पाऊस पडताच पेरणीच्या वेळेस शेतकऱ्यांकडून एकाचवेळी खतासाठी मागणी होते. त्यामुळे वेळेवर खत पुरवठा होण्यास अडचण येते. जवळपास तशीच परिस्थिती येत्या खरीप हंगाम २०१० मध्ये उद्‌भवण्याची शक्यता आहे. त्यामुळे फॉस्फेटिक, पोटॅशिक खतांचा संरक्षित साठा (बफर स्टॉक) फेब्रुवारी ते मे या कमी खत वापराच्या कालावधीमध्ये विविध जिल्ह्यात करून ठेवण्याचे ठरले आहे. यामुळे हंगामात मागणीच्यावेळी व अपुरा पुरवठा होत असताना या खत साठ्यातून शेतकऱ्यांना खताची उपलब्धता करून देता येईल.

---oo---

**. . .७/**

**पाणीपुरवठा व स्वच्छता सुविधेच्या सार्वत्रिकरणास मान्यता**

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त २०११-१२ पर्यंत ग्रामीण व नागरी भागामध्ये पाणीपुरवठा व स्वच्छता सेवा सर्व नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी शासनाचा मानस आहे. त्यादृष्टीने ग्रामीण व नागरी भागासाठी राज्य शासनाने काही व्यापक व धोरणात्मक निर्णय घेण्यात आले.

या निर्णयानुसार (१) ग्रामीण तसेच नागरी भागातील अधिकृत घरांमध्ये ``घरात शौचालय दारात पाणी`` या संकल्पनेच्या आधारावर पाणीपुरवठा नळ जोडणी व शौचालय किंवा जेथे आवश्यक भासेल तेथे मीटर असलेल्या गट जोडण्या देण्यात येईल.

(२) नागरी पाणीपुरवठा क्षेत्रामध्ये सुधारणा करण्यासाठी अनधिकृत नळजोडणी शोधून त्या योग्य व्यासाच्या, पाईप लाईनमधून व योग्य जागेतून घेतल्या आहेत काय ? याची शहानिशा केली जाईल. आवश्यक शुल्क आकारून नियमित करण्यासाठी विशेष मोहीम विशिष्ट मुदतीत (कट ऑफ डेट) राबविण्यात येईल.

(३) ग्रामीण व नागरी भागात ज्या ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधली जातील त्या बांधकाम क्षेत्राच्या (बिल्ट-अप एरिया) १५ टक्के वाणिज्यिक वापरासाठी उपलब्ध करणे तसेच अनुज्ञेय क्षेत्राचा वापर जाहिरातीसाठी करण्यास मान्यता देण्यात आली.

(४) नागरी भागातील झोपडपट्टीवासियांना वैयक्तिक किंवा सामुदायिक स्वरुपात पाणीपुरवठा व स्वच्छता सेवांच्या सुविधा देण्यात येतील. झोपडपट्टी भागामध्ये सार्वजनिक शौचालये बांधणे व त्यांचे दैनिक संचालन व व्यवस्थापन अशा शौचालयाचा वापर करणाऱ्या स्थानिक झोपडपट्टीधारकांच्या संस्था किंवा अन्य स्वयंसेवी संस्था (एनजीओ)कडे सुपूर्द करण्यात येतील. अशा सुविधा त्यांना वैयक्तिकरित्या उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांचे राहते घर/झोपड्या या अधिकृत मानले जाणार नाही. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे निर्मल मुंबई महानगर प्रदेश अभियान याच तत्वावर राज्यातील उर्वरित नागरी क्षेत्रामध्ये राबविण्यात येईल.

(५) राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व इतर रस्त्यांवर यात्री सुविधा केंद्र म्हणून स्वच्छतागृहाची व्यवस्था सार्वजनिक खाजगी सहभागातून करण्यात येईल. ज्या संस्था स्वच्छतागृहे बांधून त्याची देखभाल सुविधा प्रदान करतील अशा संस्थांना व्यावसायिक प्रयोजनार्थ बांधकाम करण्याची परवानगी देण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्यात येईल.

(६) ग्रामीण तसेच नागरी भागातील केंद्र व राज्य शासनाच्या विभागाच्या इमारतीमध्ये तेथील कर्मचारीवर्ग व अभ्यागतांसाठी स्वच्छतागृह बांधून त्याची देखभाल व दुरूस्ती करण्याची जबाबदारी संबंधित विभागावर राहील. त्यासाठी आवश्यक तरतूद संबंधित विभागाने आणि कार्यान्वयन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येईल.

(७) ग्रामीण व नागरी भागातील सर्व नागरिकांना वैयक्तिक व सामुहिक स्वच्छतागृहाचा विकल्प देऊन **गाव स्वच्छता आराखडे** तयार करून त्याची अंमलबजावणी डिसेंबर २०११ पर्यंत पूर्ण केली जाईल. १ जानेवारी २०१२ पासून उघड्यावरील शौचविधी पूर्णपणे प्रतिबंधीत केली जाईल. या तारखेनंतर उघड्यावर जाणाऱ्या कुटुंबाकडून स्वच्छता कर वसूल करण्याकरिता मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व महानगरपालिका आणि नगरपरिषद अधिनियमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील.

(८) नागरी भागातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी वैयक्तिक शौचालय व नळ जोडणी उपलब्ध करून देण्यासाठी नवीन योजना घेऊन अनुक्रमे सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभागामार्फत तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल.

(९) ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद व महानगरपालिकाच्या सदस्याकडे शौचालय नसल्यास त्यांना अपात्र ठरविण्याबाबत संबंधित अधिनियमात सदस्य अपात्रता याचा अंतर्भाव करण्यास तसेच शासकीय, निमशासकीय, महामंडळ, राज्य उपक्रमातील कर्मचारी/अधिकारी यांनी सुद्धा त्यांच्या स्वतःच्या घरी शौचालय नसल्यास मार्च २०११ पर्यंत बांधावे तसेच प्रमाणपत्र संबंधित विभागाने त्यांच्याकडून घेण्यास मान्यता देण्यात आली.

(१०) विविध विभागाच्या वैयक्तिक कल्याणकारी योजना राबविण्यासाठी शौचालय असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

---oo---

**ठाणे जिल्हा महानगरपालिका हद्दीसाठी**
**कौटुंबिक न्यायालय मंजूर**

ठाणे जिल्ह्याच्या महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रासाठी कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यास व त्यासाठी १६ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली.

त्यापैकी न्यायाधिशाचे पद १२,०००-१६,५०० रुपये व त्यावरील वेतनश्रेणीचे असल्याने त्यास मान्यता देण्यात आली. यासाठी एकूण खर्च ३२,०९,९४० लाख रूपये एवढा आहे

. राज्यात सध्या मुंबई - ७, पुणे - ५, नागपूर - ४ व औरंगाबाद २ या चार प्रमुख जिल्ह्यांमध्ये एकूण १८ कौटुंबिक न्यायालये कार्यरत आहेत. तसेच अकोला, नाशिक, अमरावती व कोल्हापुर येथे कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. अमरावती व अकोला येथील कौटुंबिक न्यायालय कार्यरत झाले आहेत.

----o----

**वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या व्यक्ती व संस्था यांच्यावर होत असलेल्या**
**विध्वंसक कारवाया व मोडतोड थांबविण्यासाठीचा**
**अध्यादेश पूर्नप्रख्यापित करण्याचा निर्णय**

महाराष्ट्र वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या व्यक्ती व संस्था (हिंसा थाबविण्यासाठी तसेच मालमत्तेचे नुकसान थांबविण्यासाठीचा) अध्यादेश, २०१० हा अध्यादेश नव्याने पुर्नप्रख्यापित करण्यास मान्यता देण्यात आली.

याबाबतचे विधेयक विधानपरिषदेमध्ये दि. २१ डिसेंबर २००९ रोजी संमत झाले मात्र विधानसभेने ते मंजूर करण्यापूर्वीच विधिमंडळाची सत्रसमाप्ती झाली.

वैद्यकीय सेवा व्यक्तींवरील हल्ले तसेच इस्पितळे वैद्यकीय सेवा संस्था यांची मोडतोड यासंदर्भातील गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ होत असून त्यांना प्रतिबंध करण्यासाठीचा कायदा अस्तित्वात असणे अगत्याचे आहे. परिणामतः याबाबतचा महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अध्यादेश, २०१० पुर्नप्रख्यापित करणे आवश्यक असल्याने वरील निर्णय घेण्यात आला.

----0----

**ग्रामीण पाणी पुरवठा क्षेत्रात**
**जलस्वराज्य टप्पा २ राबविण्यास मान्यता**

ग्रामीण पाणी पुरवठा क्षेत्रात टप्पा-२ राबविण्यास मान्यता देण्यात आली.

जलस्वराज्य टप्पा-२ अंतर्गत टप्प्याटप्प्याने पाच वर्षाच्या कालावधीत पाणी पुरवठा योजनांचा व्याप, गुणवत्ता व शाश्वती यावर भर दिला जाणार आहे. गावाची पाणी पुरवठा योजना हाती घेण्याकरीता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत दिलेल्या सूचना व मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करून गावांमध्ये प्रस्तावित योजना नागरिकांच्या सहभागातून राबविण्यात येईल.

प्रस्तावित जलस्वराज्य टप्पा-२ प्रकल्पासाठी एकूण कृती आराखडा १२०० कोटी रुपये एवढा निश्चित करण्यात येईल. या प्रकल्पाचा कालावधी २०१० ते २०१५ असा राहील. जागतिक बँकेचे अर्थसहाय्य हे इतर वित्तीय संस्थांच्या (एलआयसी, नाबार्ड) कर्जाच्या तुलनात्मकदृष्ट्या अल्प व्याजदराने प्राप्त होईल. जलस्वराज्य टप्पा-२, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व महाजल या कार्यक्रमाची अंमलबजावणी एकत्रित पध्दतीने राज्यस्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या अंतर्गत राज्य पाणी पुरवठा व सहाय्यकारी संस्था (वॉटर सप्लाय आणि सॅनिटेशन सपोर्ट ऑरगनायझेशन) करेल.

ही संस्था प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा सहाय्यता कक्ष (डिस्ट्रीक्ट सपोर्ट युनिट) स्थापित करेल. सध्या अस्तित्वात असलेल्या सुधारणा सहाय्यक व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (RSPMU), संवाद क्षमता विकास कक्ष (CCDU), भारत निर्माण कक्ष (BNC), यांच्या राज्य विभागीय व जिल्हास्तरीय कक्षांचे विलिनीकरण राज्य पाणी पुरवठा व सहाय्यकारी संस्था आणि जिल्हा सहाय्यता कक्षात करण्यात येईल. जलस्वराज्य प्रकल्प तसेच इतर प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी नव्याने अधिकारी व कर्मचारी न नेमता एकाच छत्राखाली आणून पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या सर्व योजनांची अंमलबजावणी एकात्मिक पध्दतीने केली जाईल.

नवीन योजना हाती घेतांना, पूर्वी घेण्यात आलेल्या सर्व योजनांचा सर्वंकष विचार करून व वेगवेगळ्या स्त्रोतातून नागरिकांना पुरेसे पाणी कसे उपलब्ध करून देता येईल या बाबीस प्राधान्य दिले जाईल. ज्या गावामध्ये नवीन नळयोजना घेण्याची आवश्यकता नाही तेथे सध्या अस्तित्वात असलेल्या योजनांची देखभाल व दुरूस्ती तसेच पाणी गुणवत्ता कायम ठेवून स्वच्छता या बाबींवर जलस्वराज्य टप्पा-२ या कार्यक्रमांतर्गत जनजागृती करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण जयंती वर्षामध्ये जलस्वराज्य टप्पा-२ प्रकल्पद्वारे दोन वर्षाच्या कालावधीमध्ये राज्यातील सर्व नागरिकांना पेयजल सुरक्षा व शाश्वतीच्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत. पिण्याचे पाणी व स्वच्छतेचे सार्वजनिकतेच्या दृष्टीने हे एक महत्वाचे पाऊल ठरेल. पेयजल सुरक्षेचा मुलभूत व व्यापक दृष्टीने विचार करून आराखडे विविध स्तरावर सहभागात्मक पध्दतीने तयार केले जातील. पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी करण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाचा उपयोग होईल.

राज्यस्तरावरील शक्तीप्रदान समितीने जलस्वराज्य प्रकल्प-२ ला तत्वतः मान्यता दिलेली आहे. या समितीचे अध्यक्ष प्रधान सचिव (वित्त) व प्रधान सचिव (नियोजन) हे सदस्य आहेत.

---o---

## महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळातील कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय

नागपूर येथील महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली.

ही वेतनश्रेणी १.४.२००८ पासून लागू करण्यात येईल. १.४.२००८ पूर्वीची थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही. तसेच ५० टक्के महागाई भत्ता सुधारित वेतनश्रेणी लागू केल्यानंतर मूळ वेतनात समाविष्ट करण्यात येईल.

----o----

## सवलतीच्या दरात ५ जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणाची योजना मार्च, २०१० पर्यन्त चालू राहणार

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत जानेवारी, २०१० ते मार्च, २०१० या कालावधीत सवलतीच्या दराने गहू, तांदूळ, तूरडाळ, साखर व पामतेल या ५ वस्तूंचे लाभार्थ्यांस शिधावाटप दुकानातून वितरणाचे सध्याचे भाव कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी ३०९.४० कोटी रुपये एवढया भांडवली खर्चास व प्रतिमाह ११३.५१ कोटी रुपये एवढा आर्थिक भार सोसून वरील योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली.

या योजनेअंतर्गत स्वस्त धान्य दुकानातून एपीएलच्या लाभार्थ्यांसाठी गहू ७ रुपये २० पैसे प्रति किलो, तांदूळ ९ रुपये ६० पैसे प्रति किलो, प्रतिकार्ड २ किलो साखर २०/- रुपये प्रति किलो या दराने तसेच सर्व लाभार्थ्यांसाठी तूरडाळ ५५/- रुपये प्रति किलो व पामतेल ३०/- रुपये प्रिति लिटर या दराने रास्त भाव दुकानांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. गहू आणि तांदूळ, व साखरेसाठी लाभार्थ्यांची संख्या १.४४ कोटी, तूरडाळ व पामतेलासाठी लाभार्थ्यांची संख्या २ कोटी इतकी आहे. या योजनेसाठी शासनाला दरमहा ५० हजार मे.टन गहू ११.८० रुपये प्रति किलो दराने व तांदूळ ५२ हजार मे.टन १४.८८ रुपये प्रति किलो या दराने, तूरडाळ रुपये ३५०० मे.टन ७०/- रुपये प्रति किलो या दराने, साखर २८ हजार ८०० मे.टन रुपये ३८/- रुपये प्रति किलो या दराने, पामतेल १२ हजार मे.टन ३२.५७ रुपये प्रति लिटर या दराने खरेदी करावे लागेल.

केंद्रिय कृषी मंत्री यांनी तूरडाळीबरोबर पिवळी डाळ वापरण्यावर भर दिला आहे. म्हणून, महाराष्ट्रात प्रायोगिक तत्वावर काही प्रमाणात पिवळी डाळ वितरीत करण्याचा सुध्दा विचार करण्यात येईल.

----------

## " महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान"

## राबविण्यास मान्यता

राज्यातील नागरी भागांचा नियोजनबध्द पध्दतीने विकास करुन जनतेच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी व शासनाने विहीत केलेल्या मानकांप्रमाणे विविध मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान राबविण्यास मान्यता देण्यात आली.

या अभियानांतर्गत राज्यातील "ड" वर्ग महानगरपालिका व प्रमुख नगरपालिका/ नगरपंचायतींमध्ये खालील स्वरुपाच्या पायाभूत सुविधा विकसित करण्याचे संकल्पित आहे :-

१. नागरी दळणवळण साधनांचा विकास.

२. घनकचरा व्यवस्थापन.

३. नागरी रस्त्यावरील पथदिव्यांमध्ये उर्जा बचतीच्या योजना राबविणे.

४. विहित मानकानुसार सामाजिक सोयी व सुविधांचा विकास करणे.

५. नागरी तिर्थक्षेत्रांचा सुनियोजित विकास करणे.

६. गिरीस्थानाचा सुनियोजित विकास करणे.

७. सार्वजनिक पुरातन वास्तुंचे जतन तसेच उद्याने, तलाव, नैसर्गिक जलस्त्रोत यांचे संवर्धन व विकास करणे.

८. पाणी पुरवठा, मलनि:सारण व नागरी स्वच्छता इ. सुविधा विकसित करणे किंवा त्यांचा दर्जा वाढ करणे.

९. शालेय शिक्षणाशी निगडीत पायाभूत सुविधांचा विकास

१०. नागरी आरोग्याशी निगडीत पायाभूत सुविधांचा विकास

११. गलीच्छ वस्ती मुक्त शहरे निर्माण करणे.

१२. नागरी पर्यावरणात सुधारणा करणे.

सदर अभियान राबविण्याकरीता मंत्रालयीन स्तरावर तसेच आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचलनालय यांचेकडे एक स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचलनालय हे या महाअभियानासाठी राज्य स्तरीय नोडेल एजन्सी म्हणून काम पहातील. या नगरोत्थान अभियानाच्या विविध उप अभियानातंर्गत प्रकल्प तीन प्रकारे राबविण्यात येतील.

१. पुर्णतः सार्वजनिक - खाजगी सहभागातून (Public Privated Partnership) तत्वावर.

२. सार्वजनिक - खाजगी सहभागातून पूर्णत: न होण्याजोगे प्रकल्प हे वर्धनक्षम होण्यासाठी Viability Gap Funding करणे कामी अनुदान व कर्ज मंजूर करणे.

३. सार्वजनिक - खाजगी सहभागातून न राबविता येणाऱ्या प्रकल्पांसाठी अनुदान व सवलतीचे कर्ज मंजूर करणे.

हया महाअभियांनातर्गत मंजूर प्रकल्पासाठी लागणारा अनुदानाची रक्कम संबंधित मंत्रालयीन विभागाकडून अर्थसंकल्पीय तरतूदीतून उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच या अभियानासाठी महानगरपालिका / नगरपालिका यांना कर्जाचे वितरण महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी (MUIDCL) किंवा यथास्थिती एम.एम.आर.डी.ए. मार्फत करण्यात येईल. नगरोत्थान अभियांनातर्गत पायाभूत सुविधांशी निगडीत प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी " प्रकल्प मान्यता व सनियत्रंण समिती " गठीत करण्यात येईल.

या अभियांनातर्गत वर उल्लेख केलेल्या पायाभूत सुविधांच्या अनुषंगाने विविध प्रकल्प राबविण्यात येणार आहेत.

----------------

## मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ मध्ये सुधारणा

नोंदणी व नुतनीकरण दाखला देण्याबाबत अधिनियमातील कलम २(३२) ऐवजी कलम ७(२) (अ) व कलम ७ (२) (ब) मध्ये वर्षासंबंधी असलेल्या व्याख्येत पुढीलप्रमाणे अंशत: बदल करण्यास मान्यता देण्यात आली :-

**कलम ७(२) (अ) -** नोंदणी व नुतनीकरण दाखल्याच्या दिनांकापासून पुढील १२ महिन्यांच्या कालावधीसाठी विधीग्राह्य असेल.

**कलम ७(२)(ब) -** नोंदणी प्रमाणपत्र मालकाच्या विकल्पानुसार एका वेळी ३६ महिन्यांच्या कालावधीसाठी त्या कालावधीची फी भरल्यानंतर देता येईल किंवा त्याचे नुतनीकरण करता येईल. या ३६ महिन्यांचा कालावधी नुतनीकरण दाखला दिल्याच्या दिनांकापासून ३६ महिन्यांपर्यंत विधीग्राह्य राहील.

१८ फेब्रुवारी २००९ चा मंत्रीमंडळ निर्णय अंतिम करण्याच्या अनुषंगाने अध्यादेश केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर निर्गमित करण्यास तसेच केंद्र शासनाकडून अध्यादेश मान्यतेस विलंब झाल्यास आगामी अधिवेशनात विधेयक मांडण्यास मान्यता देण्यात आली.

---oo---

## भेसळीचे अपराध करणाऱ्या व्यक्तींना जन्मठेपेची शिक्षा

सार्वजनिक आरोग्य सुरक्षितता, यांना बाधक ठरणाऱ्या भेसळीचे अपराध करणाऱ्या व्यक्तींना जन्मठेपेची शिक्षा व दंड ठोठाविण्यात येईल. याअनुषंगाने भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम २७२, २७३, २७४, २७५, २७६ मध्ये सुधारणा करण्यात येईल. सध्या या गुन्ह्यांसाठी ६ महिने कारावास आणि १ हजार रुपये दंड ठोठावला जातो.

विधीमंडळाचे अधिवेशन सध्या सुरु नसल्याने अध्यादेश काढण्यासाठी राज्यपालांकडे वरील प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात येईल. त्यानंतर भारतीय दंड संहितेमध्ये सुधारणा करण्याबाबतचा अध्यादेश केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येईल.

खाद्य पदार्थ, औषधीद्रव्ये तसेच पेयांमध्ये होणाऱ्या भेसळीमुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. भेसळीमुळे होणाऱ्या स्लो-पॉयझनिंगमुळे अनेक आजार निर्माण होत आहेत व त्याचा विपरीत परिणाम समाजाच्या सर्व स्तरांवर होत आहे. परिणामतः भेसळ रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करुन प्रचलित शिक्षेमध्ये वाढ करण्याची नितांत आवश्यकता आहे.

केंद्र सरकारच्या मान्यतेने यापूर्वी १९७३ मध्ये पश्चिम बंगाल, १९७५ मध्ये उत्तर प्रदेश व १९९९ मध्ये ओरीसा या राज्यांनी वरील कलमांत बदल करुन वरील कलमाखाली गुन्हा करणाऱ्यास ६ महिन्यांच्या शिक्षेऐवजी जन्मठेपेची शिक्षा केली आहे व त्यासोबत दंडही आकारण्यात आलेला आहे. ओरीसा, पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेश राज्यांच्या धर्तीवर वरील कलमांत शिक्षेची मर्यादा ही सहा महिन्यांवरुन जन्मठेपेची करावी व त्यासोबत दंडाची रक्कमही आकारण्यांत यावी. हा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्याची गरज आहे.

-------------